# विकारांनुसार नामजप-उपाय



## विषयसूची


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ७

卐 ग्रंथाचे मनोगत ९


### ‘नामजप-उपाय’ या प्रस्तुत ग्रंथमालिकेतील प्रथम खंड ‘विकार-निर्मूलनासाठी नामजप’ याची अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


१. ‘जप’ या शब्दाची व्युत्पत्ती व अर्थ अन् ‘नामजप’ या शब्दाचा अर्थ

२. ‘नामजप’ ही सर्वांसाठी सुलभ अशी उपचारपद्धत !

  २ अ. बंधनविरहित

  २ आ. कष्टदायक नसलेली उपायपद्धत

३. विकार-निर्मूलनाच्या दृष्टीने नामजपाचे महत्त्व

४. विशिष्ट विकारांवर उपयुक्त असे विशिष्ट देवतांचे नामजप करून इंद्रियांतील विकृती दूर होण्याची प्रक्रिया

५. विकार-निर्मूलनासाठी उपयुक्त असलेले नामजपाचे विविध प्रकार आणि त्यांमागील शास्त्र

६. देवता, देवतांशी संबंधित पंचतत्त्वे, पंचतत्त्वांशी संबंधित मुद्रा, तसेच न्यासस्थाने यांचा उपायांच्या दृष्टीने असलेला परस्परसंबंध

७. नामजप, मुद्रा आणि न्यास यांची उपयुक्तता सिद्ध करणारे वैद्यकीय संशोधन आणि वैज्ञानिक चाचणी

८. अस्थमा असणाऱ्या साधकाने ‘ॐ नमः शिवाय ।’ हा नामजप केल्याने त्याला होणारे सूक्ष्मातील लाभ दर्शवणारे चित्र

९. नामजपाच्या उपायांच्या जोडीला प्रतिदिन साधना करण्याचे महत्त्व

१०. आगामी काळात भीषण आपत्तींतून वाचण्यासाठी साधना करणे आणि भगवंताचे भक्त बनणे अपरिहार्य !

## ‘नामजप-उपाय’ या प्रस्तुत ग्रंथमालिकेतील द्वितीय खंड ‘नामजपांमुळे दूर होणारे विकार’ याची अनुक्रमणिका

१. काही नामजपांमुळे बरे होऊ शकणारे विकार

२. नामजप करतांना करायच्या मुद्रा आणि न्यास, तसेच न्यास करण्यासाठीचे स्थान समजून घेणे आणि त्यानुसार उपाय करणे

३. उपायांसाठी आवश्यक मुद्रा, न्यास व न्यास करण्यासाठीचे स्थान समजून घेऊन उपाय करण्यापेक्षा ते स्वतः शोधून उपाय करणे अधिक श्रेष्ठ !

४. नामजपाचे उपाय करण्याविषयीच्या सूचना

५. नामजपाने विकार-निर्मूलन होण्याविषयी साधकांना आलेल्या काही अनुभूती

## प्रस्तुत ग्रंथाची (तृतीय खंडाची) अनुक्रमणिका

**१. नामजपाच्या विविध प्रकारांपैकी स्वतःच्या प्रकृतीनुसार अधिक उपयुक्त असलेला नामजप कसा निवडावा ?** ११

**२. विकारांनुसार विविध नामजप, नामजपाशी संबंधित महाभूते (तत्त्वे) आणि काही विशेष न्यासस्थाने (विकारसूची)** १२

२ अ. काही सूचना १२

२ आ. विकारसूची १५

१. डोके आणि चेतासंस्था (मज्जासंस्था - मेंदू, चेतारज्जू आणि चेतातंतू) यांचे विकार १५

२. डोळ्यांचे विकार १९

३. नाकाचे विकार २०

४. तोंडाचे विकार २२

५. दात आणि हिरड्या यांचे विकार २४

६. कानांचे विकार २४

७. घशाचे विकार ८. रक्ताभिसरण संस्थेचे विकार २६

९. श्‍वसनसंस्थेचे विकार २७

१०. पचनसंस्थेचे विकार २९

११. मूत्रवहनसंस्थेचे विकार ३५

१२. प्रजननसंस्थेचे विकार ३६

१३. अस्थी आणि स्नायू संस्थेचे विकार ४१

१४. त्वचेचे विकार ४५

१५. केसांचे विकार ४८

१६. नखांचा विकार १७. रक्ताचे विकार ४८

१८. अंतःस्रावी ग्रंथींचे विकार ४९

१९. ताप आणि जंतूसंसर्गजन्य विकार ५०

२०. विविध प्रकारच्या गाठी आणि कर्करोग ५२

२१. लहान मुलांचे विकार २२. विषबाधा होणे ५३

२३. अपघात होणे २४. अन्य शारीरिक विकार ५४

२५. मानसिक विकार ५६

२६. अन्य लक्षणे किंवा विकार (शरीर आणि / किंवा मन यांच्याशी संबंधित, तसेच कोणत्याही अवयवांत उत्पन्न होऊ शकणारी लक्षणे किंवा विकार) ६४

२७. अन्य ६९

२८. सर्व विकारांवर उपाय ७०

卐 **परिशिष्ट १ : काही विकार आणि आध्यात्मिक त्रास यांच्या निवारणासाठी करायचे नामजपादी उपाय** ७१

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७५

# ग्रंथाचे मनोगत

‘नामजप-उपाय’ या ग्रंथमालिकेच्या या खंडात ३०० हून अधिक शारीरिक आणि मानसिक विकारांवर उपयुक्त ठरतील असे विविध नामजप एकाच दृष्टीक्षेपात कळण्यासाठी सूचीच्या स्वरूपात दिले आहेत. यात प्रामुख्याने देवतांचे नामजप आहेत.

मनुष्याचा देह हा पंचमहाभूतांनी (पंचतत्त्वांनी) बनलेला असल्याने त्याला होणारे विकार हेही पंचतत्त्वांशी संबंधित असतात. देवतांचे कार्य सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही स्तरांवर असते. देवतांच्या निर्गुण स्तराच्या कार्याच्या संदर्भात देवता पंचतत्त्वांच्या पलीकडे आहेत, तर सगुण स्तराच्या कार्याच्या संदर्भात त्या पंचतत्त्वांनी युक्त आहेत. त्यामुळे प्रत्येकच देवतेमध्ये पंचतत्त्वे असतातच. त्यामुळे पंचतत्त्वांशी संबंधित सर्व विकार दूर करण्याचे सामर्थ्य प्रत्येकच देवतेमध्ये असते. असे असतांनाही प्रत्येक विकारासाठी विशिष्ट देवतांचे नामजप देण्याचे प्रमुख कारण म्हणजे, एखाद्या देवतेमध्ये असलेल्या पंचतत्त्वांपैकी एखाद्या तत्त्वाच्या आधिक्यानुसार ती देवता त्या तत्त्वाशी संबंधित विकार अन्य देवतांच्या तुलनेत लवकर बरे करू शकते.

या ग्रंथात पुढच्या पुढच्या टप्प्याचे शब्दब्रह्म (गायत्री मंत्रातील शब्दांचे नामजप), अक्षरब्रह्म (देवतेचे तत्त्व/शक्ती संपुटित झालेल्या अक्षरांचे नामजप), बीजमंत्र आणि अंकजप हेही दिले आहेत. एखाद्याची प्रकृती, गतजन्मातील किंवा या जन्मातील साधना, आध्यात्मिक पातळी आदींचा विचार करता त्याला पुढच्या पुढच्या टप्प्याचा नामजपही उपयुक्त ठरू शकतो.

नामजप-उपाय अधिक परिणामकारक होण्यासाठी करायच्या मुद्रा आणि न्यास यांची माहिती, तसेच नामजपाला कसे बसावे, नामजप भावपूर्ण होण्यासाठी काय करावे आदी उपयुक्त सूचना ‘नामजपांमुळे दूर होणारे विकार’ या ग्रंथामध्ये दिल्या आहेत.

‘नामजपाचे उपाय करून जास्तीतजास्त रुग्ण लवकरात लवकर विकारमुक्त होवोत’, ही श्री गुरुचरणी आणि विश्वपालक श्री नारायणाच्या चरणी प्रार्थना ! – **संकलक**